# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे अंक चौथा पृष्ठे ११ एप्रिल २०२२ www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


या अंकात


पान ०२ रंगलो आम्ही - बहुळकर दांपत्याशी मनमोकळ्या गप्पा

पान ०३ प्रार्थना समाज रोड आणि विलेपार्ल्याचे पंढरपूर-कलकत्ता कनेक्शन!

पान ०६ मार्जार कुळातील मोठे प्राणी (बिगकॅट्स) – चित्ता

पान ०८ पापिरस - प्राचीन इजिप्तचा कल्पवृक्ष




पान १०

नोटेशन - नो टेन्शन !!!!

आनंद सहस्त्रबुद्धे

## जागतिक ब्रिज स्पर्धा
# अनिल पाध्ये यांच्या भारतीय संघाला उपविजेतेपद





भारतीय संघाने जागतिक ब्रिज अजिंक्यपद स्पर्धेत वरिष्ठ गटात उपविजेतेपद मिळवून इतिहास घडवला आहे. अंतिम सामन्यात मात्र पोलंडविरुद्ध त्यांना हार पत्करावी लागली. इटलीमध्ये झालेल्या या डी'ओर्सी कपच्या स्पर्धेत रौप्य पदक मिळवणार्या टीममध्ये ख्यातनाम ब्रिजपटू पार्लेकर अनिल पाध्ये यांचा समावेश होता ही आपणा सर्वांसाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.

अनिल पाध्ये हे लोकमान्य सेवा संघाच्या ब्रिज शाखेचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्याच पुढाकाराने ब्रिज फेडरेशन ऑफ इंडिया आणि लोकमान्य सेवा संघ ह्यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब्रिज'च्या प्रशिक्षणासाठी 'ब्रिज पाठशाळा' हा राष्ट्रीय उपक्रम सुरू करण्यात आला .

अनिल आणि सर्व टीमचे खूप खूप अभिनंदन.

## मेडिक्वीन मेडिको पेजेंट, मिसेस महाराष्ट्र २०२२
# डॉ संजीवनी राजवाडे सन्मानित




पुण्यातील हॉटेल ऑर्किड येथे ८ एप्रिल रोजी ह्या सौंदर्यस्पर्धेची महाअंतिम फेरी पार पडली. विलेपार्ल्यातील डॉ. संजीवनी राजवाडे ह्यांना 'Mediquin Inspiration', ह्या सन्मानाने गौरविण्यात आले. डॉ संजीवनी ह्या पार्ल्याच्या रहिवासी असून गेली २७ वर्ष पार्ल्यात आयुर्वेद व ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतात. लोकमान्य सेवा संघाच्या वैद्यकीय शाखेत गेली २० वर्षे त्या मानद वैद्यकीय तज्ञ म्हणून काम करीत आहेत. त्या वैद्यकिय शाखेच्या सचिव असून लोकमान्य सेवा संघाच्या कार्यकारिणी सदस्य आहेत. कोरोना योद्धा म्हणून त्यांना भारत विकास परिषदेने गौरविले होते. म न से तर्फे सुद्धा महिला दिना निमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला होता.



'मेडिक्वीन'च्या डॉ. प्रेरणा बेरी व डॉ . प्राजक्ता शहा त्यांच्या तर्फे विवाहित महिला डॉक्टरांसाठी ही स्पर्धा घेतली जाते. ही केवळ सौंदर्यस्पर्धा नसून निरामय आरोग्य व कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ आहे. ह्या स्पर्धेसाठी महाराष्ट्रात चार विविध केंद्रावर निवड चाचणी घेण्यात आली होती व २०० महिलांनी ह्यासाठी नाव नोंदणी केली होती. त्यातून २ गटात विभागून ५५ स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. शीतल रोका , डॉ. उज्वला बर्दापूरकर, डॉ. श्रद्धा जावंजळ , डॉ. अमोल गिते व अभिनेते समीर धर्माधिकारी ह्यांनी ज्युरी म्हणून काम पाहिले. अनेक दिग्गज व सुप्रसिध्द व्यक्तींनी कार्यक्रमास हजेरी लावली व दाद ही दिली.







## संपादकीय

टिळक मंदिरासारखी पार्ल्यातील मध्यवर्ती सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था शंभरी गाठते ह्याचा समस्त पार्लेकरांना सार्थ अभिमान आहे. एके काळी पार्ले परिसरातील सामाजिक जीवनाला व सांस्कृतिक उपक्रमांना दिशा देण्याचे महत्वाचे काम टिळक मंदिराकडून होत असे. विविध विषयांवरील भाषणे, परिसंवाद, शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम, नाट्यवाचन व सादरीकरण अशा अनेक प्रकारचे कार्यक्रम तेथे होत असत. त्यावेळच्या समाजाची ती गरज होती.

आज जग खूप बदलले आहे. कौटुंबिक व सामाजिक रचना, लोकांची मानसिकता, आवडी निवडी, तरुण पिढीसमोरील आव्हाने, सारे सारे बदलले आहे. कोव्हीड महामारीनंतर तर सर्वच उलटेपालटे झाले आहे. अशा परिस्थितीत टिळक मंदिर व पार्ल्यातील इतरही संस्थांमधील पारंपरिक पद्धतीच्या कार्यक्रमांना लोक गर्दी करत नसतील तर त्यात नवल नाही. पूर्वीच्या पुण्याईवर फार काळ वाटचाल करता येत नाही. इतिहासाकडून प्रेरणा घेणे वेगळे आणि वर्तमानाकडे पाठ फिरवून इतिहासात रममाण होणे वेगळे. सामाजिक संस्थेवर सतत लोकाभिमुख राहण्याची जबाबदारी असते. बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार आपल्या कार्यक्रमांची, उपक्रमांची आखणी करावी लागते. ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा अनुभव महत्वाचा असतोच पण जर नव्या जगाशी जुळवून घेण्याची त्यांची मानसिकता नसेल तर ते उद्याची आव्हाने पेलणारा समाज कसा घडवणार ? आज पार्ल्याच्या बहुतेक संस्था ज्येष्ठ मंडळींच्या ताब्यात आहेत त्यामुळे तेथे तरुणांना उपयुक्त ठरतील, आकर्षित करतील अश्या कार्यक्रमांचे / उपक्रमांचे आयोजन होण्याची शक्यता कमीच आहे. माफ करा, पण 'ज्येष्ठांच्या, ज्येष्ठांसाठी व ज्येष्ठांनी चालवलेल्या' हीच पार्ल्यातील सर्व संस्थांची tagline आहे कि काय अशी शंका येते.

आज पार्ल्यातील तरुण अनेक क्षेत्रे पादाक्रांत करत आहे. त्यांच्या आशा आकांक्षांना सामावून घेतील, त्यांच्या पंखांना बळ देतील असे उपक्रम राबवण्याची आज गरज आहे. दुर्दैवाने असे उपक्रम आपल्या पार्ल्यात अभावानेच आढळतात. आपल्या सर्वच संस्था ह्या महत्वाच्या बाबतीत कमी पडतात असे खेदाने म्हणावे लागते.

नव्या दमाचे, प्रागतिक व व्यावसायिक दृष्टिकोन असणारे कार्यकर्ते जोपर्यंत मिळत नाहीत तोपर्यंत ह्या संस्था पार्ल्यासाठी, विशेषत: पार्ल्यातील तरुण वर्गासाठी काही करू शकतील ही शक्यता धूसरच आहे. अर्थात उद्या काही चांगले घडेल अशी आशा करायला काहीच हरकत नाही !

## Making of मानापमान






लेखक कवी गीतकार प्राध्यापक डॉ शिरीष गोपाळ देशपांडे जे मुळचे विदर्भाचे आहेत, गेली अनेक वर्षे विलेपार्ले मधे राहिले आहेत. त्यांच्या राजा शहाजी , अरण्यकांड, वैकल्य , शिवछत्रपती, शहाजिजाई अशा अनेक प्रसिध्द कादंबऱ्या प्रकाशित आहेत तसेच त्यांनी गोट्या आणि राजा शिवछत्रपती ह्या TV मालिकांचे लेखनही केले आहे. अभिनेते सुबोध भावे दिग्दर्शित मानापमान ह्या आगामी चित्रपटाचे लेखन शिरीष गोपाळ देशपांडे करत असून त्यांची मुलगी ऊर्जा देशपांडे ह्या चित्रपटाची सहाय्यक लेखिका आहे. ह्याचे संगीत दिग्दर्शन गायक, संगीतकार शंकर महादेवन करणार आहेत. हा चित्रपट २०२३ मध्ये सर्वत्र प्रदर्शित होईल.

## रंगलो आम्ही - बहुळकर दांपत्याशी मनमोकळ्या गप्पा

लोकमान्य सेवा संघाच्या शतकमहोत्सवी वर्षात लोकमान्य शताब्दी व्याख्यानमालेअंतर्गत सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सुहास बहुळकर आणि समीक्षक श्रीमती साधना बहुळकर यांची एका अर्थी आगळीवेगळी मुलाखत ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक डॉक्टर उदय निरगुडकर यांनी घेतली. वयाच्या चौथ्या वर्षापासून चित्र काढणारे श्री सुहास बहुळकर आणि गेली चार दशके चित्रकलेवर समीक्षा करणाऱ्या त्यांच्या पत्नी साधना बहुळकर यांचा जीवनाचा प्रवास श्री निरगुडकर यांनी आपल्या खुमासदार शैलीत उलगडला.एखाद्या चित्रामागचं व्याकरण किंवा गणित न समजता त्या चित्राचा आस्वाद घेता येतो असे श्री बहुळकर यांनी सांगितले. डॉ. निरगुडकर यांनी चित्राचा अर्थ समजण्याच्या दृष्टीने त्याचं समीक्षण करणे ह्या श्रीमती साधना बहुळकर यांच्या कार्याचे खास कौतुक केले. श्री. बहुळकर यांनी एकंदरीत केंद्र आणि राज्य सरकारची उदासीनता आणि चित्रकलेच्या दालनात महाराष्ट्र कमी पडल्याची खंत व्यक्त केली. तसेच मुख्य चित्रकाराला मिळणारे अत्यल्प मानधन आणि त्यानंतर विक्रीतून मिळणारा नफा याबद्दल असलेली तफावत विस्तृत केली .

एकाच दिवशी या दोन कलाकारांच्या पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ अभ्यासक आणि ज्येष्ठ पत्रकार श्री. दिनकर गांगल आणि ललित कला अकादमीचे माजी अध्यक्ष शिल्पकार उत्तम पाचारणे यांच्या हस्ते झाले.त्यापैकी एक पुस्तक चित्रकार दीनानाथ दलाल चित्र आणि चरित्र हे सुहास बहुळकर यांनी लिहिलेले तर दुसरे हिंदी भाषेमध्ये बॉम्बे स्कूल कला परंपरा की स्त्री का चित्रकार हे श्रीमती साधना बहुळकर यांनी लिहिलेले पुस्तक.

श्री. दिनकर गांगल यांनी हे पुस्तक कलेच्या भिंगातून कसे वजनदार आहे हे सांगितले तर श्री उत्तम पाचारणे यांनी पाच चित्रकारांचा यामध्ये गौरव केल्याबद्दल श्रीमती साधना बहुळकर यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकमान्य सेवा संघाचे कार्यवाह श्री. महेश काळे यांनी केले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात कार्यवाह डॉक्टर रश्मी फडणवीस यांनी दोन्ही पुस्तकांची विस्तृतपणे माहिती दिली.



कार्यक्रमाचा समारोप कार्याध्यक्ष श्री. उदय तारदाळकर यांनी एका कलाप्रेमी दांपत्याची दोन अपत्ये म्हणजेच त्यांची दोन पुस्तके एकाच दिवशी प्रकाशित होणे हा विलक्षण योगायोग आहे असा उल्लेख करून बहुळकर दांपत्याचा गौरव केला.




आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
रोहित जाधव
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# प्रार्थना समाज रोड आणि विलेपाल्याचे पंढरपूर-कलकत्ता कनेक्शन !

नमस्कार पार्लेपूरनिवासी !

यावेळी आपण जाणून घेणार आहोत विलेपार्ल्यामधील असा एक मार्ग- ज्याचे नाव, प्रबोधन, समाज परिवर्तन, धार्मिक आणि सामाजिक सुधारणा यांच्यासाठी प्रसिद्ध असलेल्या प्रार्थना समाज या संस्थेवरून ठेवण्यात आले आहे. या मार्गाच्या जन्माची कथा अतिशय सुरस आहे. पार्ल्यामधील एक ख्यातनाम समाज सेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि पत्रकार वैकुंठ रंगाजी भेंडे यांना त्यांचे मित्र आणि पार्ल्यामधील दुसरे एक प्रतिष्ठित नागरिक श्री शेषगिरी कलबाग यांनी पार्ल्यामध्ये जागा घेण्याचा आग्रह केला. त्यांनी एक दोन जागा पाहिल्या. परंतु तेथे रस्ता नव्हता. तेव्हा पार्ल्यामधील एक घर कंत्राटदार श्री काटदरे यांनी भेंडे यांच्या जागेलगतच्या, त्यांच्या जवळच्या मोठ्या जागेचे लहान-लहान प्लॉट्स पाडले व त्यांना जोडण्यासाठी एक नवीन मार्ग निर्माण केला. तोच हा प्रार्थना समाज मार्ग !

कलकत्ता येथील राजा राम मोहन राय यांनी स्थापन केलेल्या ब्राम्हो समाजावरून प्रेरणा घेऊन प्रार्थना समाजाची स्थापना आत्माराम पांडुरंग यांनी १८६७ यावर्षी केली. नंतर पुढे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे प्रार्थना समाज चळवळीमध्ये सामील झाले आणि ही संस्था महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध झाली. मुंबई प्रार्थना समाजाचे एक निष्ठावंत सभासद आणि कार्यकर्ते राव बहाद्दर लाल शंकर उमिया शंकर त्रिवेदी यांनी १८७५ यावर्षी पंढरपूर येथे एका बालकाश्रमाची स्थापना केली. नंतर पुढे त्यांनी ही संस्था मुंबई प्रार्थना समाजाकडे सोपवली. साधारणपणे १९२७ यावर्षी विलेपार्ले येथील प्रार्थना समाजाचे तळमळीचे कार्यकर्ते श्रीयुत बी बी केसकर यांच्या खटपटीने या बालकाश्रमासाठी विलेपार्ले येथे स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी देणगीच्या स्वरूपात रावसाहेब रामकृष्ण महादेव साळवी या उदार सद्गृहस्थांनी जागा दिली. नंतर मुंबईतील नामवंत कार्यकर्त्या डॉक्टर काशिबाई नवरंगे आणि सुंदराबाई सिरूर यांनी पुढाकार घेऊन नाटक वगैरेंसारखे कार्यक्रम करून निधी जमवला आणि त्या पैशांमधून या जागेवर एक इमारत बांधण्यात आली. पुढे १९३२ च्या जून महिन्यामध्ये पंढरपूर येथील बालकाश्रमाच्या विलेपार्ले येथील 'विलेपार्ले होम' या शाखेची स्थापना झाली . १९३७ मध्ये प्रार्थना समाजाचे विश्वस्त श्री दत्तात्रय नारायण शिरूर यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती सुंदराबाई शिरूर यांनी या बालकाश्रमाला दहा हजार रुपये देणगी दिली आणि याचे नामकरण द ना सिरूर बालकाश्रम असे करण्यात आले. तर मंडळी अशा प्रकारे प्रार्थना समाज मार्ग हा विलेपार्ल्याला पंढरपूर आणि कलकत्त्याशी जोडणारा दुवा ठरला आहे !!



सुरुवातीला येथील मुले विलेपार्ल्यातील म्युनिसिपल प्राथमिक शाळेत जात असत. नंतर पुढे त्यांना गिरगावमधील प्रार्थना समाजाच्या राममोहन इंग्लिश शाळेमध्ये पुढील शिक्षणासाठी पाठवण्यात येत असे. एवढ्या लांब पाठवणे गैरसोयीचे व्हायचे. म्हणून सिरूर बालकाश्रमाला जोडून एखादी शिक्षण संस्था असावी असे प्रार्थना समाजाच्या व्यवस्थापक मंडळास वाटू लागले आणि अनेक जणांच्या प्रयत्नाने १९५७च्या आसपास प्रार्थना समाज हायस्कूल या नावाने ही शाळा उभी राहिली. आजचा आपल्या लेखाचा विषय आहे तो प्रार्थना समाज मार्ग या प्रशालेच्या नावावरूनच पुढे परिचित झाला !



द ना सिरूर बालकाश्रमाचे विलेपार्ल्याच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनात एक वेगळे स्थान आहे. पार्लेकरांची सहानुभूती आणि सर्व प्रकारची मदत ह्या आश्रमाला गेली वर्षानुवर्षे मिळत आहे. मंडळी, वर्षातून तीन-चार वेळा तरी या बालकाश्रमाला अवश्य भेट द्या आणि आपापल्या परीने जी काही मदत शक्य असेल ती अवश्य करा.

प्रार्थना समाज रस्ता हा या प्रार्थना समाज शाळेजवळ हनुमान मार्गापासून सुरू झालेल्या रामभाऊ बर्वे मार्गापासून माधव गडकरी चौकातून सुरु होतो आणि पुढे राम मंदिर मार्गास




जाऊन मिळतो. सुप्रसिद्ध मराठी गायक जयवंत

पान ४ वर



पान ४ वरून

**प्रार्थना समाज रोड आणि.......**

कुलकर्णी प्रार्थना समाज मार्गावर राहायचे. गडकरी चौकातून राम मंदिर मार्गाच्या दिशेने पश्चिमेकडे निघालो की, प्रार्थना समाज हायस्कूलच्या समोरच्या बाजूला थोडे पुढे डाव्या बाजूला सुप्रसिद्ध व्यास संगीत विद्या मंदिर आहे. प्रार्थना समाज मार्ग आणि महंत मार्ग जेथे एकमेकाला छेदतात त्याच्या थोडे आधी, डाव्या बाजूला चिमणा रामाचे छोटेखानी परंतु प्रसिद्ध




मंदिर आहे. हे मंदिर, पार्ल्यामधील एक नामवंत समाजसेवक श्रीमान भीमराव खंडेराव उपाख्य भाऊराव कोराने यांनी १९३० च्या आसपास बांधले. हे मंदिर म्हणजे केवळ पूजेचे किंवा उपासनेतील स्थान नव्हते तर भाऊरावांनी ते एक महत्त्वाचे सांस्कृतिक आणि साहित्यिक केंद्रही बनवले होते. राम नवमीच्या उत्सवात ते अनेक साहित्यिकांना बोलावीत आणि किर्तन भाषण किंवा मनोरंजक साहित्य चर्चा असे कार्यक्रम ते कित्येक वर्षे राबवत असत. पुलंनी सुद्धा येथे कोणा कीर्तनकाराला तबल्याची साथ केल्याची आठवण लिहून ठेवली आहे.

महंत मार्गाला ओलांडून पुढे गेले की आगासकर कुटुंबीयांची रामदास आश्रम ही अत्यंत देखणी इंडो ब्रिटिश वास्तुशैलीमधील इमारत आहे. या घराचे निर्माते डॉक्टर आगासकर हे श्रीरामाचे निस्सीम भक्त होते. या



भव्य इमारतीमध्ये बऱ्याच दूरदर्शन मालिका आणि चित्रपटांचे चित्रण होत असते.

तसेच पुढे गेलो की डाव्या बाजूला एक छोटे, बैठे बंगलावजा, कोकणी पद्धतीचे घर आहे. हे



घर आहे फडणीस कुटुंबीयांचे-रमा निवास! सत्तर ऐंशी वर्षापूर्वीचे पार्ले कसे एखाद्या कोकणी गावासारखे हिरवेगार आणि रमणीय होते याची झलक पाहायची असेल किंवा छोटेखानी प्रचिती घ्यायची असेल तर फडणीसांचे हे रमा निवास घर पहावे! पार्ले टिळक शाळेमध्ये एकेकाळी शारीरिक शिक्षण शिकवणाऱ्या सुप्रसिद्ध




फडणीस बाई आणि त्यांच्या भगिनी येथे राहतात. घराच्या चारी बाजूला प्रशस्त जागा असून तेथे विविध प्रकारची फुलझाडे आणि फळझाडे फडणीस कुटुंबियांनी अत्यंत आवडीने लावली आहेत. कोकणच्या लाल मातीच्या रंगात न्हालेले आणि चहूबाजूंनी हिरव्यागर्द झाडीमधून अल्लडपणे डोकावणारे हे सर्वांग सुंदर कौलारू घर आपल्याला कोकणातील घराची आठवण करून देते! पार्ल्यामध्ये चौखूर फैलावणाऱ्या सिमेंटच्या वाळवंटातले मरुद्यान आहे हे! या महानगरामध्ये दशदिशांना घेरणाऱ्या गगनचुंबी इमारतींच्या वादळ वाऱ्यामध्ये एखादी छोटीशी पणती तग धरून आपले अस्तित्व टिकवून राहावी असे या छोट्याशा घरकुलाकडे पाहिले की वाटते. आधुनिक सुखसोयींनी समृद्ध अशा फ्लॅट संस्कृतीचा मोह टाळून फडणीस भगिनी आपले पारंपरिक जीवन जपत आहेत याचे कौतुक करावे तेवढे थोडेच!

फडणीस भगिनींच्या घराला लागूनच डाव्याबाजूला एक अत्यंत छोटी परंतु ऐतिहासिक गल्ली जाते. या गल्लीचे पुढे पायवाटेत रूपांतर होते.

मंडळी, ही गल्ली तुम्हाला आपले लाडके ‘पु. लं.’ यांच्या एकेकाळच्या निवासस्थानापर्यंत घेऊन जाते. होय! पार्ल्यामध्ये पु ल देशपांडे ज्या




त्रिंबक सदनमध्ये राहायचे तेथे १९८५ मध्ये

पान ५ वर






# Indian Institutes of Science Education and Research (IISER)

आय.आय.टी. बद्दल आपल्या सर्वांना माहिती आहे की या तंत्रज्ञान शिक्षणासाठीच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडातील प्रतिष्ठित आणि सरकारी संस्था आहेत. परंतु विज्ञानाच्या शिक्षणासाठी अशा प्रकारच्या सरकारी संस्था पूर्वी अस्तित्वात नव्हत्या. म्हणून विज्ञानाच्या अभ्यासासाठी अशा संस्था सुरू करण्याची आवश्यकता होती. भारतरत्न प्रा. सी एन आर राव यांनी या संदर्भात पुढाकार घेतला आणि याचे फळ म्हणून भारत सरकारने सुरुवातीला 2 भारतीय विज्ञान संशोधन शिक्षण संस्था Indian Institute for Science Education and Ressarch (IISER) 16 ऑगस्ट 2006 रोजी पुणे आणि कोलकाता येथे स्थापन केल्या.

आज आपल्या देशात अशा सात IISER (पुणे, कोलकाता, बर्हमपूर, भोपाळ, मोहाली, तिरुवनंतपुरम आणि तिरुपती) आहेत. या संस्था विज्ञान शिक्षण देत आहेतच तसेच आंतरविद्याशाखीय (inter disciplinery) विज्ञान शिक्षण पण देत आहेत .

या संस्था तुलनेने नवीन असल्याने आपल्यापैकी अनेकांना त्यांची भूमिका आणि कार्यपद्धती माहित नसते. (IISER ची विद्यार्थ्यांची पहिली तुकडी २०१२ मध्ये पदवीधर झाली.) IISER द्वारे शिकण्याची प्रक्रिया आणि संशोधन मिश्रणामुळे अविश्वसनीय आणि अर्थपूर्ण फायदे उपलब्ध झाले आहेत. अल्पावधीतच IISER ने शोधनिबंध आणि पेटंटच्या रूपाने मोठ्या प्रमाणावर बौद्धिक संपदा निर्माण केली आहे. ही अभिमानाची बाब आहे. थोडक्यात, असे म्हणता येईल की IISER (आयसर) संस्था या विज्ञान विषयासाठी आयआयटी सारख्या आहेत आणि ह्या दर्जेदार शिक्षणात आयआयटीच्या बरोबरीच्या आहेत.

IISER ची गुणवत्ता Times Higher Education World University 2020 रँकिंगमध्ये, IISER पुणे, जागतिक स्तरावर पहिल्या 800 मध्ये आणि भारतात 10 व्या क्रमांकावर आहे.)

IISER मध्ये प्रवेश:

बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आयसर मध्ये प्रवेश मिळू शकतो.

बारावी (विज्ञान) नंतर IISER मध्ये उपलब्ध असलेले अभ्यासक्रम

1) B.S. (पदवी अभ्यासक्रम) आणि

2) B.S.-M.S. ड्युअल डिग्री प्रोग्राम (पदवी + पदव्युत्तर अभ्यासक्रम)

पात्रता

अ) कौन्सिल ऑफ बोर्ड्स ऑफ स्कूल एज्युकेशन इन इंडिया (COBSE) द्वारे मान्यताप्राप्त कोणत्याही बोर्डातून 2020 किंवा 2021 मध्ये विज्ञान शाखेचे 10+2 (किंवा समतुल्य स्तराची परीक्षा) उत्तीर्ण झालेले उमेदवार आणि श्रेणीनुसार कट ऑफमध्ये गुण मिळवलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत.

ब) फक्त खालील तीन माध्यमांद्वारे IISER मध्ये प्रवेश मिळू शकतो.

(याबद्दल पुढील लेखात अतिरिक्त माहिती दिली जाईल.)

(1) किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना (KVPY)

(2) भारतीय तंत्रज्ञान संस्थांची संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE-Advanced)

(३) राज्य आणि केंद्रीय बोर्ड (State and Central Boards)

**प्रा. विनायक अंतरकर**
९८२०६५१०६८




पान ४ वरून
**प्रार्थना समाज रोड आणि.......**

झालेली त्रिंबक सदन ही इमारत या गल्लीच्या टोकावर आहे ! त्रिंबक सदन आणि पुलंचे मातामह श्रीमान वामन मंगेश दुभाषी यांची ऋग्वेदी ही इमारत यांच्यामध्ये एक छोटी पायवाट आहे. पुलं या पायवाटेवरून, या गल्लीमधून बऱ्याच वेळा चालले असतील ही भावना पार्लेकरांसाठी किती सुखद आहे बरे ! त्रिंबक सदनमध्ये आज पु ल देशपांडे यांचे लाडके पुतणे श्री जयंत देशपांडे आणि इतर नातेवाईक राहतात. याच गल्लीमधे श्रीराम सदन नावाची एक इमारत आहे. येथे किसन परदेशी नावाचे एक क्रिकेटपटू राहायचे. हा अत्यंत गुणी क्रिकेटपटू जेवढा पुढे यायला हवा होता तेवढा दुर्दैवाने पुढे आला नाही. परंतु उत्कृष्ट फलंदाज आणि गोलंदाज असलेले किसन परदेशी त्याकाळी मुंबईमधील विविध जिमखान्यांच्या वतीने खेळायचे. सी के नायडू यांच्या बरोबर सुद्धा परदेशी खेळलेले आहेत. त्याकाळी सी के नायडू किसन परदेशी यांच्या घरी अनेक वेळा जायचे असे आम्ही ऐकून आहोत.

प्रार्थना समाज मार्गावरून फडणीस बंगल्याच्या लगेच पुढे डाव्या हाताला आता जी प्रार्थना सोसायटी आहे तेथे आधी एक छोटी इमारत होती आणि तेथे दुसऱ्या-तिसऱ्या कोणाचे नाही, तर सुप्रसिद्ध उद्योगपती दस्तुरखुद्द आबासाहेब गरवारे यांचे एक गॅरेज होते ! पुढे एक यशस्वी उद्योगपती म्हणून प्रसिद्ध झालेले आबासाहेब गरवारे कोणे एके काळी विलेपार्ले येथे गॅरेज चालवत असतील असे आज कुणाला सांगूनही खरे वाटायचे नाही. यासंदर्भात एक अतिशय मनोरंजक किंवदंती आम्ही ऐकून आहोत. काही दशकांपूर्वी पार्लेकरांमध्ये या घटनेचा मोठा बोलबाला होता असेही आमच्या कानावर आले आहे. परंतु याची प्रत्यक्ष शहानिशा करून घेणे आम्हाला जमले नाही याची नोंद घ्यावी. वाचकांपैकी कोणाला याची माहिती असल्यास त्यांनी आमच्याशी अवश्य संपर्क साधावा.

त्याचं असं झालं की, इंग्लंडमध्ये एकदा इंग्लंडच्या राणीने वापरलेल्या कारचा लिलाव होणार होता. आबासाहेबांच्या हे कानावर आले आणि त्यांनी काहीही करून ती गाडी विकत घ्यायची ठरवली ! तेथील लिलाव करणाऱ्या दलालाला त्यांनी ओळख काढून गाठले आणि सांगितले की जी काही शेवटची किंमत असेल त्यावर काही पौंड अधिक ठेवून ती गाडी त्यांनाच मिळावी यासाठी मदत करावी, आणि ती गाडी त्यांनी चक्क मिळवली सुद्धा ! !

नंतर पुढे ती गाडी लंडनहून विलेपार्ले येथे आणून आबासाहेब गरवारे मोठ्या अभिमानाने तिची अशी जाहिरात करायचे की, 'लंडनची राणी ज्या गाडीतून फिरायची त्या गाडीतून फिरायची संधी आलेली आहे. तिचा नाममात्र किमतीत लाभ घ्यावा !'

प्रार्थना समाज रोड, राम मंदिर मार्गाला जेथे मिळतो तेथे समोरच पार्ल्याचे भूषण असणारी आणखी एक व्यक्ती राहते. मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉक्टर स्नेहलता देशमुख यांचे ते घर आहे !

द. ना. सिरूर बालकाश्रम , प्रार्थना समाज हायस्कूल वगैरेंसारख्या संस्था, जयवंत कुलकर्णी, स्नेहलता देशमुख आणि प्रत्यक्ष पु ल देशपांडे यांच्याशी निगडीत असलेला हा प्रार्थना समाज मार्ग विलेपार्ल्याच्या सांस्कृतिक , साहित्यिक आणि सामाजिक इतिहासाचा जिवंत साक्षीदार बनून राहिला आहे !


**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५



# मार्जार कुळातील मोठे प्राणी (बिगकॅट्स) - चित्ता

आसपास

पाच सहा वर्षांपूर्वीची घटना. दुपारी दोन-अडीच वाजले असावेत. केनियातील जगप्रसिद्ध मसाईमारा नॅशनल पार्क मध्ये टोयोटाच्या 'लँड क्रूझर' मधून फिरत-फिरत आम्ही प्राणी शोधत होतो. केनियाला येऊन आता चार दिवस उलटले होते. सांबुरू येथील हत्ती, बिबळे, जिराफ, अतिशय दुर्मिळ असे ग्रेव्हीज झेब्रे, जेनेरुक आणि इतर अनेक वन्यजीव पाहून झाले. नैवाशा आणि नकुरू येथे पाण गेंडे, काळे आणि पांढरे दोन शिंग असेलेले गेंडे तसेच अगणित फ्लेमिंगो, पेलिकन पाहून झाले. अगदी मसाईमारातील एका दिवसाच्या भटकंतीत काळ्या पाठीचे लांडगे, सिंह, केप बफेलो तसेच शहामृग वगैरे पशु पक्षी दिसल्याने केनियाला ट्रिप घेऊन आल्याचे सार्थक झाले असे वाटत होते. पूर्वी ज्या प्राण्यांची पायी जाऊन शिकार करणे अतिशय जोखमीचे आणि धोकादायक समजले जायचे अशा पाच प्राण्यांना केनिया मध्ये 'बिगफाईव्ह' म्हणतात. यात हत्ती, सिंह, केप बफेलो, बिबळ्या आणि गेंड्यांचा समावेश होतो. काल हे पाचही एकाच दिवसात दिसल्याने सफारी करून हॉटेलवर परतल्यानंतर तेथील सर्वांनी टाळ्यांच्या गजरात आमचे स्वागत केले होते. इतके असूनही मनात कुठेतरी अपूर्णतेची भावना होती. विचार केल्या नंतर अजूनही चित्ता दृष्टीपथात न पडल्याने असे होत आहे हे लक्षात आले आणि त्याच्या मागावर निघालो. चित्त्यामध्ये काय वेगळे आहे?



चित्ता हा जमिनीवर वास्तव्य करणाऱ्या प्राण्यां मध्ये सर्वात वेगवान आहे. एरव्ही लांब लांब ढांगा टाकत चालणारा चित्ता शिकार करते वेळी शून्या पासून ताशी शंभर किमी वेग फक्त तीन सेकंदात पकडतो. १००मी अंतर कापायला चित्त्याला सहा सेकंदापेक्षाही कमी वेळ लागतो. जागतिक किर्तीमान प्रस्थापित केलेल्या उसेन बोल्टने हेच अंतर ९.५८ सेकंदात पार केले होते. इतक्या कमी वेळात इतका प्रचंड वेग कदाचित शर्यतीत भाग घेणाऱ्या खास रचना असलेल्या गाड्यांचं फक्त घेत असाव्यात. शिकार केल्या नंतर चित्त्याला अतिशय दम लागतो. श्वासोच्छ्वास पूर्ववत होण्यासाठी तसेच रक्तदाब आणि शरीराचे तपमान सामान्य येईपर्यंत जवळजवळ अर्धातास चित्त्याला काहीही करता येत नाही. या वेळी सिंह, बिबळे तर सोडाच तरस, लांडगेच काय अगदी गिधाडे पण त्याची शिकार पळवतात. असहाय्य चित्ता बिचारा काहीही करू शकत नाही. 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' असाच हा प्रकार नाही का?

एका उडीत २१ फूट अंतर आणि इतका प्रचंड वेग असलेला चित्ता सावजापाठी लागल्यावर शिकार १००% होणारच असे वाटत असले तरी ते तितकेसे खरे नाही. १०-१५ प्रयत्नात एकदाच शिकार होते. निसर्ग देवतेने सर्व प्राण्यांना जगायची समसमान संधी उपलब्ध करून दिली आहे. वेग, नागमोडी वळणे घेण्याचे कसब, गंध घेण्याची क्षमता आणि तीक्ष्ण श्रवण शक्ती यांच्या जोरावर गॅझेल, स्प्रिंगबक, काळवीट त्याला गुंगारा देऊ शकतात. दुसरे म्हणजे हा प्रचंड वेग चित्ता फक्त १००० ते १२०० फुटापर्यंतच राखू शकतो. त्यामुळे वाळलेल्या गवताच्या रंगाशी साधर्म्य असणारा चित्त्याचा रंग, अंगावरील ठिपके याचा फायदा घेत लपत छपत सावजाच्या अगदी जवळ जाऊन मगच शिकारीवर हल्ला करतो. असे असले तरी कमी वेळा साधणारी शिकार, शिकार पळवून नेण्याचे प्रकार आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मानवाकडून होणारी हत्या आणि अतिक्रमण यांच्या परिणाम स्वरूपी हा उमदा प्राणी नामशेष होण्याचा मार्गावर आहे.

चित्त्याचे शरीर म्हणजे अभियांत्रिकी रचनेचा परमोच्च बिंदू. वेगाने धावताना हवेचा कमीत कमी प्रतिरोध व्हावा म्हणून छोटे निमुळते, झुकलेले डोके, लांबुडके निमुळते धड, लांब ढांगा, कमीतकमी चरबी या सर्व बाबी अतिशय उपयुक्त. धावत असताना क्षणार्धात वळण्यासाठी शेपटीचा उपयोग सुकाणूसारखा होतो. कुठल्यातरी मोटार सायकलच्या जाहिरातीत धावणारा चित्ता अचानक बदलून बाईकमध्ये रूपांतरित झाल्याचे दृश्य दाखविण्यात आले होते. हे किती वास्तववादी आहे ते चित्ता पाहिल्यावरच पटते. इंग्रजीत एरोडायनॅमिक म्हणतात त्या पद्धतीची शरीर यष्टी. चित्ता मार्जार कुळातील प्राण्यापेक्षा अनेक बाबतीत भिन्न आहे. इतरांप्रमाणे तो नख्या आत घेऊ शकत नाही. धावताना जमिनीवर चांगली पकड मिळावी म्हणून हि उपाययोजना नसेलना? दुसरे म्हणजे डोळ्याजवळून गालावर उतरलेल्या काळ्या अश्रूरेखेमुळे तो चटकन ओळखता येतो. चित्त्याला गर्जना करता येत नसल्याने तो थोडासा मवाळ वाटतो. मांजरीसारखा आवाज किंवा घसा साफ करताना जो आवाज होतो त्या सारखे त्याचे गुरगुरणे असते. म्हणूनच त्याच्या शिकार चोरांना त्याची दहशत वाटत नसावी.

कुटुंब व्यवस्थेच्या बाबतीतही चित्ता भिन्न आहे. सिंह कळपाने राहणारा तर वाघ एकांडा शिलेदार. काही कुंपणावर बसणाऱ्या राजकीय पक्षांप्रमाणे चित्ता ना इकडे ना तिकडे. सामान्यत: पिल्ले नसलेली मादी एकटी असते. एकमेकांचे भाऊ लागणारे दोन किंवा अधिक नर एकत्र असतात. बरोबर असले तरी शिकार वेगवेगळी करतात.


असा हा चित्ता पाहायला मिळावा म्हणून चुटपुट लागणे रास्तच होते. नजर जाईल तिथपर्यंत सुकलेले गवत दिसत होते. तुरळक सॉसेजट्री, बोरीची काटेरी झाडे क्षीण सावली देत उभी होती. केप बफेलो (रान म्हशी) कळपाने रवंथ करत बसल्या होत्या. आमचा गाईड जॉन गाडी मैलोन्मैल पिटाळत होता. चित्ते एखाद्या वाळवीच्या वारुळावर, छोट्याशा डगरींवर किंवा दगडावर बसून आपल्या तीक्ष्ण नजरेने टेहळणी करत बसतात. आज बहुदा ते दुसऱ्या भागात गेले असावेत. अचानक जॉनच्या शोधक आणि अचूक दृष्टीने चित्ता हेरला. वाळलेल्या गवतात बसून आराम करत असल्याचे जॉन म्हणाला. अर्थात कितीही बारकाईने पाहिले तरी आम्हाला काही दिसत नव्हता. निसर्गाच्या रंगसंगतीत बेमालूमपणे मिसळलेला चित्ता दिसण्यासाठी बहुदा मसाई असावे लागते. आता गाडी खूप जवळ पोहचली होती आणि अचानक आता आराम करत बसलेला चित्ता दिसला. आंधळा मागतो एक आणि देव देतो दोन या उक्तीनुसार बाजूलाच त्याचा भाऊ पण दिसला. चित्त्यांचा मुख्य शत्रू सिंह. म्हणूनच की काय आराम करतानाही त्यांची नजर आणि देहबोली सावध होती. अचानक काय झालं कोण जाणे दोघेही भाऊ उठले आणि गाडीच्या जवळून डाव्या बाजूने पुढे जाऊन सावलीत बसले. खोळीतून कॅमेरे निघाले आणि भराभर फोटो काढले गेले. आफ्रिकेची सफारी पूर्णतया सफल झाल्याचे वाटले. आफ्रिकेसारखे बिग फाईव्ह भारतातही आहेत. आपल्याकडे आशियायी हत्ती, सिंह , एक शिंगी गेंडे, गवे / जंगली म्हशी , बिबळे आहेत की ! वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन त्यांना पाहता, अभ्यासता आणि चित्रित करता येते. पण भारतात चित्ता नाही हा सल कायमचा आहेच.



१९४८ हे भारताच्या वन्य जीव इतिहासातील काळे वर्षच. या साली रामानुज प्रतापसिंग या संस्थानिकाने मध्यप्रदेशातील सरगुजा येथे तीन चित्त्यांची शिकार केली आणि भारतातील चित्ता अस्ताला गेला. पुढे १९५२ साली तो नामशेष झाल्याची अधिकृत घोषणा झाली. मध्यप्रदेशातील आणि राजस्थानातील प्रदेश खरेतर त्याच्या अधिवासासाठी योग्यच. पण बेसुमार, निर्बंध शिकार, मानवी अतिक्रमणामुळे होणारा अधिवास आणि पर्यावरणाचा ह्रास आणि या मुळे होणारी अन्नाची कमतरता या गोष्टीचे मोल या वन्यजीवांना भोगायला लागले.

परंतु काळ्या ढगाला चांदीची झालर असते त्या प्रमाणे या बाबतीत आशेचा एक छोटासा किरण दिसत आहे. काही सामाजिक संस्थांनी भारतात चित्त्याचे पुनर्वसन करण्यासाठी जी

पान ७ वर



पान ६ वरून

## मार्जार कुळातील....

पावले उचलली त्यांना यश येत आहे असे वाटते. १९७१ साली स्वर्गीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कार्य काळात ईराण चित्ते आयात करून भारतातील योग्य अधिवासात नैसर्गिक पद्धतीने मोकळे सोडण्यासाठी अभ्यास झाला. नंतर आणीबाणीची घोषणा झाली आणि हा प्रकल्प बासनात गुंडाळला गेला.

२००९ सालापासून हा मुद्दा परत ऐरणीवर आला आणि मध्य भारतातील १० अधिवासांचा सखोल अभ्यास करून मध्य प्रदेशातील कुनो येथे चित्ता प्रकल्प राबवायचे निश्चित झाले. विद्यमान केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी मात्र आता हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरण्यासाठी कंबर कसली आहे. ६ जानेवारी २०२२ रोजी झालेल्या बैठकीत आफ्रिकेतील नामिबिया येथून १२ चित्ते आणून त्यांना संरक्षित जंगलात सोडण्याचा कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. कुनोच्या जंगलात रानडुकरे, हरणे, सांबरे मुबलक असल्याने हि जागा योग्य असल्याचं अभ्यासकांनी जाहीर केले आहे. राजकारणातील चढ-उतार, लालफितीच्या फायली, आर्थिक चणचण या गोष्टी हा प्रकल्प राबवण्याच्या आड येऊ नयेत हीच प्रामाणिक अपेक्षा आणि असे झाले तर आज येथे मुक्तपणे संचार करणाऱ्या हरणांना आणि तत्सम प्राण्यांना देवाने आपल्याला इतका वेग का दिला आहे ते समजेल.


........लेट अस कीप अवर फिंगर्स क्रॉस्ड!

संजय देवस्थळी
९८३३८६६४६२

# महानगरपालिका मुख्यालय

मुंबई महानगरपालिकेची इमारत ही मुंबईतील एक देखणी इमारत आहे. तिचा पायाभरणी समारंभ ६ डिसेंबर १८८४ला 'व्हॉईसरॉय लॉर्ड रिपन' यांच्या हस्ते झाला व सन १८९१ साली ही इमारत बांधून झाली. इमारतीच्या मनोऱ्याची उंची जमिनीकडून २३५ फूट आहे. दर्शनी भागावर वरच्या बाजूला एका भव्य मूर्तीचे शिल्प बसवले आहे. त्याखाली लॅटिन भाषेत 'अर्बस् प्रिमा इन इण्डीस' अशी घोषणा इंग्रजी अक्षरात कोरलेली आहे. 'भारताचे नंबर एकचे शहर' असा त्याचा अर्थ होतो. इमारतीच्या प्रवेश मंडपाबाहेर 'सर फिरोजशहा मेहता' (१८४५-१९१५) यांचा ब्रांझ धातूतला घडवलेला पुतळा आपल्याला दिसतो. फिरोज शहा मेहता यांना हिंदकेसरी अशी उपाधी होती. शिल्पमुद्रेत ते हात उंचावून काही सांगत असल्याची पोज शिल्पकाराने दिलेली आहे. महानगरपालिकेच्या या मुख्यालय इमारतीचा विस्तार बाजूलाच महानगरपालिका मार्गावर नवीन इमारत बांधून केला आहे. सुदैवाने नवीन इमारत पहिल्या वास्तूशी सुसंगत अशी उभारली आहे. मुख्य व नव्या बांधकामात वापरलेल्या साहित्याचा पोत व प्रमाण आदी गोष्टी एकमेकांशी मिळत्याजुळत्या आहेत. आजही महानगरपालिकेची ही इमारत मुंबईचे महत्त्व पटवून देत असते.

संगीता बेहेरे
९८६७७५८३१०
(फोर्टमध्ये फिरताना - भालचंद्र हर्डीकर)




## प्रा वसंत सोनावणी यांचा कला संचालनालयामार्फत सन्मान




१९५६ पासून राज्याच्या कला संचालनालयामार्फत कला प्रदर्शन आयोजित केले जाते. त्याचे औचित्य साधून दोन ज्येष्ठ कलाकारांना सन्मानित केले जाते. ह्या वर्षी हा मान ज्येष्ठ चित्रकार व सर जे जे स्कूल ऑफ आर्ट चे माजी अधिष्ठाता प्रा वसंत सोनावणी ह्यांना मिळाला आहे.

प्रा. वसंत सोनवणी ह्यांनी कलाध्यापनास साधारण १९७० पासुन सुरुवात केली. अनेक सेमिनार्स आणि कार्यशाळांमध्ये सरांचा सहभाग होता. १९७५ ते २०१४ या कालखंडात सरांना अनेक प्रतिष्ठेचे मानसन्मान आणि पुरस्कार प्राप्त झाले. त्यांना राष्ट्रीय ललित कला अकादमी कडूनही सन्मानित करण्यात आले आहे.

प्रा सोनावणी मूळचे नाशिक जिल्ह्यातील निफाड येथील असून मुंबईत कला शिक्षण घेऊन २००१ पर्यंत म्हणजे तब्बल ३१ वर्षे सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथे शिक्षक, अधिव्याख्याता, प्रोफेसर ऑफ आर्ट, अशा चढत्या पदनामाच्या जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पेलल्या.

प्रा. वसंत सोनवणी यांच्या कलाकृतीचे विषयदेखील निसर्गातील घटकांनीच सजलेले असतात. ते कॅनव्हासवर ब्रशऐवजी 'स्पंज' वा 'रबर' असलेल्या रोलरने रंग लेपन करतात. प्रा. वसंत सोनवणी यांचे प्रदीर्घ कला योगदान म्हणूनच शासनाला गौरवपूर्ण वाटले. त्यांचा सन्मान ही समस्त कलाक्षेत्राची तसेच पार्ल्याची मान उंचवणारी घटना आहे.



# पापिरस - प्राचीन इजिप्तचा कल्पवृक्ष

देशोदेशी

कागद बनविण्याचा शोध लागेपर्यंत आपले पूर्वज भूर्जपत्र, लाकडाच्या फळ्या, झाडाची सालं, मातीच्या टॅब्लेटेस् किंवा चक्क दगड अशी साधने वापरून आपल्या दैनंदिन व्यवहाराच्या नोंदी, महत्वाच्या घडामोडी, धार्मिक उपदेश किंवा राज्य कारभाराच्या बखरी लिहून (किंवा खोदून!) ठेवत असत.

मी इजिप्तला जाईपर्यंत, पापिरस म्हणजे सुद्धा प्राचीन ईजिप्शियन समाजात फक्त कागदाला



पर्याय म्हणून वापरण्याची वस्तू अशीच माझी समजूत होती. इजिप्तमध्ये फिरताना, लक्झर, कार्नाक किंवा अबूसिम्बेल सारख्या प्राचीन देवळात किंवा लक्झर मध्ये नाईल नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील राजे राण्यांच्या थडग्यातील भित्ति चित्रात, विविध प्रकारे चितारलेल्या पापिरसच्या प्रतिमा आणि त्यांचं एकूणच वास्तु रचनेतील महत्व पाहून, ह्या साध्या गवत किंवा बांबू सारख्या दिसणाऱ्या वनस्पतीला प्राचीन इजिप्तशिअन संस्कृतीमध्ये काहीतरी विशेष महत्व असलं पाहिजे असं मला वाटू लागलं.

नारळ हा जसा आपल्या कोंकणाचा कल्पवृक्ष आहे तसंच काहीसं स्थान पापिरसला इजिप्त मध्ये होतं. त्याच्यापासून कागदासारखी भूर्जपत्रे बनवून लिहिण्यासाठी तर त्याचा उपयोग केला जात असेच, पण पापिरस विणून बनविलेल्या होड्या / तराफे हे नाईल नदीतून होणाऱ्या दळण वळणाचं महत्वाचं साधन होतं. ह्या नावा / तराफे इतक्या उत्तम दर्जाचे असत की थॉरहेयर दालहा मानव वंश शास्त्रज्ञ अश्याच नावेतून प्रवास करून पूर्ण अटलांटिक महासागर पार करून दक्षिण अमेरिकेपर्यंत गेला. त्याची हकीकत 'आम्ही पार्लेकर' मधील माझ्या वर्षभरापूर्वीच्या लेखात वाचलेली कदाचित तुम्हाला आठवत असेल. पण त्या शिवाय पापिरसचा गाभा उकडून खाल्लाही जात असे, उरलेल्या भागाचा गाई-गुरांना चारा म्हणून किंवा स्वयंपाकासाठी जळण म्हणून वापर होत असे. त्या पासून चटया, टोपल्या बनविल्या जात आणि



घरांचं छप्परही बनविता येई.

पण पापिरसला प्राचीन ईजिप्शियन संस्कृतीत महत्वाचं स्थान असण्याचं कारण निव्वळ त्याची दैनंदिन जीवनातली उपयुक्तता एव्हढंच मात्र नव्हतं. पापिरस हे एक अतिशय महत्वाचं राजकीय आणि धार्मिक प्रतीक होतं.

राजकीय दृष्ट्या प्राचीन इजिप्तचे दोन मुख्य विभाग होते - नाईल नदीच्या मुखाजवळील म्हणजे साधारणत:



प्राचीन मेम्फिस पासून (आजच्या कैरो शहराच्या जवळ दक्षिणेला) भूमध्य सागरापर्यंतचा उत्तरेचा प्रदेश (Lower इजिप्त) अणि तेथून दक्षिणेला नाइल नदीच्या उगमापर्यंतचा प्रदेश (Upper इजिप्त). दोन्ही विभागांमध्ये राजकीय कुरबुरी, वेळ प्रसंगी हाणामाऱ्याही चालू असत. मग एखादा दुसरा रामसेस किंवा तिसरा अमेनहोतेप सारखा बलिष्ठ राजा गादीवर बसल्यावर दोन्ही बाजूंना वठणीवर आणून इजिप्तचं एकत्रीकरण करत असे. इजिप्तच्या इतिहासात अश्या 'एकत्रीकरणाचा' उल्लेख वारंवार येतो आणि कित्येक प्राचीन देवळांत अश्या एकत्रीकरणाचं स्मारकही शिलालेख किंवा भित्तिचित्रांच्या स्वरूपात आपल्याला दिसतं. पापिरस हे Lower (म्हणजे उत्तरेचा विभाग) इजिप्तचं प्रतीक होतं. तर कमळ हे Upper (म्हणजे दक्षिणे कडील) इजिप्तचं प्रतिक होतं आणि ह्या एकत्रीकरणाच्या स्मारकांत राजा कमळाचं देठ आणि पापिरसचं खोड ह्यांची गाठ मारतो आहे असं दृश्य दाखविलेलं असे (पहा पहिला फोटो - कार्नाक देवालयाच्या भिंतीवरील शिल्पात राजा तिसरा अमेन होतेप अशी गाठ मारताना).

पण पापिरसच्या महत्वाचं मुख्य कारण इजिप्तच्या पुराण कथांशी निगडित होतं. इजिप्तशिअन समजुतीनुसार पृथ्वीवरील सर्व जीवनाचा उगम एका प्राचीन दलदलीतून झाला आणि पापिरस ही नाईल नदीच्या मुखाजवळील अश्याच दलदलीच्या क्षेत्रात प्रामुख्याने उगवत

पान ९ वर






पान ८ वरून

**पापिरस - ......**



असल्याने, पापिरसचं शेत हे जीवनाच्या उगमाचं प्रतीक मानलं गेलं. इजिप्तशिअन पुराणांत देवादिकांच्या आपापसातील चढाओढीच्या (जश्या आपल्या पुराणात राक्षस आणि देवांतील स्पर्धेच्या गोष्टीत आहेत) अनेक कथा आहेत - मुख्यत: सत्याचा विजय आणि दु:प्रवृत्तींचा विनाश असा बोध देणाऱ्या ह्या कथा आहेत. त्यातील अनेक प्रसिद्ध कथा सेत (दुष्ट प्रवृत्तींचं प्रतीक) आणि ओसिरीस आणि ओसिरीसची बायको आयसिस (सत्प्रवृत्तींची प्रतीकं) ह्या



दैवतांच्यातील युगानुयुगे चाललेल्या युद्धाबद्दल आहेत. त्यातील एका कथेत सेतने ओसिरीसचा वध केल्यावर त्याच्यापासून आपल्या लहानग्या बाळाला - होरसला वाचविण्यासाठी आयसिस पापिरसच्या शेतात लपून बसते असा प्रसंग आहे. अर्थात होरस मोठा होऊन आपल्या बापाच्या वधाचा सूड घेतो अशी पुढची कथा आहे. पण प्राचीन इजिप्शिअन समाजाच्या उत्तर काळात होरस हा सर्वात जास्त पुजला जाणारा देव बनला



(जसा त्यांच्या पूर्व काळात अमुन हा सर्वात महत्वाचा देव होता) त्यामुळे, ह्या पापिरसला आणि त्याच्या शेताला पवित्रतेचं जे वलय लाभलं त्याच्या खुणा अनेक प्रकारे इजिप्तशिअन देवळांत आज दिसतात.

उदाहरणार्थ पापिरसच्या देठापासून बनविलेलं ‘आंख’ प्रत्येक देवाच्या हातात तुम्हाला दिसेल (पहा दुसऱ्या फोटोतील ख्रिश्चन क्रॉस सारखं पण गोल डोकं असलेलं चिन्ह, डावीकडून पहिलं). आंख हे सर्व सुख-समृद्धीचं प्रतीक होतं. तसेच बहुतेक देवळातील स्तंभ पापिरसच्या झाडाच्या आकाराचे बनविलेले दिसतील. अनेक देवळांत पापिरसचं शेत दर्शविणारी शिल्पं दिसतील. ह्याचं सर्वात थक्क करणार उदाहरण आहे कार्नाकच्या देवळातील राजा पहिला सेटी आणि त्याचा मुलगा दुसरा रामसेस ह्यांनी उभारलेला मंडप. सुमारे ५००० चौ. मी. एव्हढ्या जागेत १०ते २१मी. (म्हणजे ३० ते ७०फूट) उंच आणि ३मी. (१० फूट) व्यासाचे पापीरसच्या देठाच्या आकाराचे १३४ स्तंभ उभारून दलदलीत उगविणाऱ्या पापिरसच्या शेतातील अंधारं, कुंद वातावरण निर्माण करणारा हा मंडप म्हणजे प्राचीन इजिप्तच्या स्थापत्य कलेचा (कदाचित त्याच्या पिरॅमिड पेक्षाही अधिक) उत्तम नमुना आहे. प्रत्येक स्तंभ आणि ह्या मंडपाच्या भिंती दोन्ही राजांच्या कारकिर्दीतील यशोगाथा सांगणाऱ्या चित्रांनी भरलेल्या आहेत. मंडपाच्या छतावर (वर उल्लेखलेला दुसरा फोटो ह्या छताच्या शिल्लक राहिलेल्या तुकड्याचा आहे) शुभ शकुन दर्शविणारी चित्रे रंगविलेली आहेत. बाकीचे सर्व फोटो ह्या मंडपातील स्तंभ, त्यावरील कला कुसर आणि भित्ति चित्रांचे आहेत.

**सतीश जोशी**
९८२०२२८२७९




सुगम संगीत : भावगीत / भक्तीगीत / अभंग व सिनेगीतांचा

**गायन क्लास**

# कलांजली

- "कलांजली" या संस्थेतर्फे मराठी, हिंदी, भावगीते भक्तिगीते त्याचबरोबर सिनेगीते शिकवण्याचे वर्ग पेठे सेफ्टी लॉकर्सच्या मागे, चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पूर्व) येथे गेल्या पाच वर्षापासून सुरू आहेत. या निमित्ताने आपली गाण्याची आवड जोपासण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे.
- प्रवेश घेण्यासाठी आपली **आवड व शिकण्याची जिद्द** हीच केवळ अट आहे.
- वयाची कोणतीही अट नसून केवळ **रूपये** २,०००/- महिन्याची फी असणार आहे. हा हॉल पूर्णत: एसी आहे.
- आडवड्यातून दोन दिवस क्लास घेतला जाईल.
- चौदा वर्ष गाणं शिकलेले डॉ.सत्यजित कोसंबी हे हार्मोनियमच्या व तबल्याच्या साथीने गाणी शिकवतात.

सोमवार ते शुक्रवार

**५.३० ते ६.३०**
**६.३० ते ७.३० व**
**७.३० ते ८.३० वाजता**

**अधिक माहितीसाठी संपर्क करा.**

**डॉ. सत्यजित कोसंबी - 8600640400**

**ठिकाण :-** पेठे सेफ्टी लॉकर्सच्या मागे, **चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पूर्व).**

**एकदा अवश्य संपर्क करा .. मग ठरवा !!!**

# नोटेशन - नो टेन्शन !!!!

गुरुकुल

पार्ल्यातील चोखंदळ मराठी माणूस जेव्हा दीनानाथ नाट्यगृहात गाण्याच्या कार्यक्रमासाठी जातो, आनंद सहस्त्रबुद्धे यांचं संगीत संयोजन असेल तर डोळे झाकून कार्यक्रमाचं बुकिंग करतो कारण कार्यक्रम उत्तम होणार याची खात्री असते. आनंद म्हणजे उत्तम संगीत संयोजन, उत्तमातले उत्तम वादक, उत्तम निवेदन तसेच उत्तम माणूसही. आम्ही पार्लेकर साठी मुलाखतीकरता विचारलं असता आपल्या रेकॉर्डिंगच्या व्यस्त कार्यक्रमातून खास वेळ काढून त्यांनी मुलाखत दिली.

त्यांची आजी आठवण सांगते, आनंद तीन वर्षांचे असताना टीव्हीवर गाण्याचा कार्यक्रम चालू होता त्यात कुहू कुहू बोले कोयलिया हे गाणं लागलं होतं. ते नुसतं ऐकून आनंद आपोआप हार्मोनियमवर वाजवू लागले. त्यावेळी भात्यापर्यंत हात सुद्धा पोहोचत नव्हता.



हार्मोनियमची सुरुवात तिकडून झाली. मनातल्या भावना व्यक्त करण्यासाठी वाद्य हा उत्तम मार्ग आहे हे लहान वयातही त्यांना जाणवलं होतं. हंसराज मोरारजी पब्लिक स्कूल ही आनंद यांची शाळा. पहिलीत असताना त्यांनी खूप अभ्यास केला आणि वर्गात पहिले आले. अर्थातच घरी सर्वांना खूप आनंद झाला. पण आनंद यांना त्यात काही विशेष वाटलं नाही. उलट हार्मोनियम वाजवायला वेळच मिळाला नाही असं काहीतरी त्या वयात वाटलं. तिथून ठरवलं की परत अभ्यासात पहिलं यायचं नाही. घरी येऊन आई - वडिलांना सांगितलं की मला अभ्यास आवडत नाही. मला संगीत करायचं आहे. आई-बाबांनी समजूत काढली, किमान पदवीधर झालं पाहिजे. त्यामुळे नाईलाजाने अभ्यास केला. आनंदच्या भाषेत, जसं बसमध्ये लिहितात, वेगमर्यादा ताशी 35 किलोमीटर, तसं दरवर्षी पोटापाण्यापुरते मार्क मिळवत गेले.

बी. कॉम झाल्यानंतर मला नोकरी करायची नाही हे आई-वडिलांना स्पष्ट सांगितलं. आईवडिलांनी निर्णय मानला, पाठिंबा दिला. एक मात्र सांगितलं, संगीत क्षेत्रात जे करशील ते उत्तमच कर. स्वत:ची वेगळी जागा निर्माण कर. त्यासाठी जे साहित्य लागतं, जसं की कीबोर्ड, कॉम्प्युटर.. ते पुरवलं. २०००-२००१ मध्ये वडिलांच्या सल्ल्याने मुंबई युनिव्हर्सिटीचा अनिल मोहिले यांचा पाच महिन्यांचा सर्टिफिकेट कोर्स केला, म्युझिक कंपोझिशन अँड डिरेक्शन. ॲडमिशनपूर्वी एक इंटरव्ह्यू झाला. मोहिले स्वत: इंटरव्ह्यू घ्यायला बसले होते. त्यांना पाहूनच मनाचं समाधान झालं. आपल्याकडे असलेलं ज्ञान भरभरून लुटणारा, प्रसंगी कडक असा गुरु लाभला. असं वाटलं, जे शोधत होतो ते भरभरून तिथे मिळालं. संगीताची भाषा आहे स्वरांची आणि तिची वेगळी स्वरलिपी असते. जिला नोटेशन्स म्हणतात. असं म्हणतात ज्याला नोटेशन कळलं, त्याला गाण्याचं व्याकरण कळलं. क्लासमध्ये अतिशय मोकळं वातावरण होतं. आनंदना नोटेशन या विषयाचा प्रचंड कंटाळा होता. खूप लिखाण. त्यांनी सरांना सांगितलं, मला नोटेशन करायचं नाही. मोहिले सर म्हणाले तुला फक्त ऐकून सूर ओळखता येतात. तू चांगलं नोटेशन लिहू शकतोस. त्यादरम्यान ते लताबाईंची एक कॉन्सर्ट अरेंज करत होते. आनंदना म्हणाले, तू कॉन्सर्टची एक रिहर्सल ऐकायला ये. लताजींची रिहर्सल. शंभरेक वादक बसले होते. प्रत्येकासमोर काहीतरी लिहिलेलं. त्यांच्या समोर जे लिहिलं होतं त्यात काहीतरी सबस्टन्स आहे. त्या शिवाय इतकं चांगलं संगीत वाजत नाही हे जाणवलं. ती रिहर्सल झाल्यानंतर सरांनी विचारलं काय वाटतं तुला? आनंद म्हणाले, मी शिकलं पाहिजे नोटेशन.

कोर्स पूर्ण झाला आणि आनंद स्टुडंट म्हणून जात होते तिथे लेक्चरर म्हणून जायला लागले. एक दिवस मोहिले सरांनी आनंद यांनी लिहिलेली 'या चिमण्यांनो' या गाण्याची नोटेशन्स पाहिली आणि विचारलं, लतादीदींच्या कॉन्सर्टसाठी असिस्ट करशील का? आनंद यांचा स्वत:वर विश्वास बसेना. कॉन्सर्टसाठी आनंदनी लिहिलेली गाण्यांची नोटेशन्स मोहिले यांना इतकी आवडली की त्यांनी नोटेशन्स करता वापरायच्या sketch pens चा अख्खा बॉक्स आणि चार्ट पेपरचा बंच काढला आणि आनंद यांना बक्षीस दिला. त्यानंतर प्रभादेवीच्या रस्त्यांवरून ते दोन्ही गोष्टी ऑस्कर घेतल्यासारख्या हातातून मिरवत फिरत होते.

२००३-२००४ सालचा उदयोन्मुख वाद्यवृंद रचनाकारासाठीचा पहिला अनिल मोहिले पुरस्कार आनंद यांना मिळाला. मोहिले सर बऱ्याच गाण्यांसाठी आनंद यांनी लिहिलेली नोटेशन्स समोर ठेवून लताजींसाठी ऑर्केस्ट्रा कंडक्ट करत होते. दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलच्या मदतीसाठी निगडीला झालेल्या त्या कॉन्सर्टनंतर सर आनंदना म्हणाले, आज तू हॅवॉक केला आहेस. हा सर्वात मोठा पुरस्कार होता. Music arranger ही अशी एक व्यक्ती आहे, की ना तो स्वत: शब्द लिहितो, ना तो शब्दांना चाल देतो, ना त्याचा आवाज तुम्हाला ऐकू येतो. पण तरी तो गाण्यामध्ये सगळीकडे असतो. तो intro music तयार करतो, जे गाण्याच्या आधी वाजतं. त्या गाण्याची ओळख ठरतं. आनंदना या गोष्टीचं प्रचंड आकर्षण वाटलं. आपण हेच काम करायचं असं ठरवलं. १९९८ साली त्यांनी प्रोफेशनल हार्मोनियम वादक म्हणून सुरुवात केली. त्यानंतर छोटे मोठे कार्यक्रम होत गेले. त्यांचा कीबोर्ड वादक म्हणून पहिला कार्यक्रम स्वरविकास या संस्थेबरोबर होता. त्या काळातील नवीन दमाचे संगीतकार श्री. विकास भाटवडेकर यांच्या नवीन रचनांचा कार्यक्रम होता. नवीन वादक, नवीन रचना. तेव्हापासून जे साहचर्य जुळलं, जो विश्वास निर्माण झाला तो आजतागायत. आजही स्वरविकासचा कार्यक्रम आनंद शिवाय होत नाही.

आनंद गेली चोवीस वर्षं या क्षेत्रात काम करत आहेत. या वर्षाच्या म्हणजेच पंचविसाव्या वर्षाच्या सुरुवातीलाच त्यांना इंद्रधनु संस्थेतर्फे संगीत क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा संगीत संयोजनासाठीचा पहिलाच सुधीर फडके जिवोन्मेष पुरस्कार मिळाला आहे. आनंद म्हणतात, हा पुरस्कार मी माझ्या सगळ्या वादकांच्या वतीने स्वीकारला आहे. ते म्हणतात, जेव्हा श्रोत्यांकडून कौतुक होतं, तेव्हा ते सारं क्रेडिट माझ्या वादकांचं असतं. माझे सगळे वादक हे या क्षेत्रात चाळीस वर्षं कार्यरत आहेत. त्यामुळे ते मी दिलेला scoreच फक्त वाजवतात असं नाही तर स्वत:ची इनपुट्सही देतात. त्यामुळे गाण्याचा दर्जा कुठच्या कुठे जातो. आनंद यांनी काही फ्रेश गाण्यांसाठी ही music arrangement केली आहे. ते म्हणतात, माझी arrangement ही शंभर टक्के माझी नसते. कुमारजींची एखादी बंदिश,



बेथोवेनची symphony, राजस्थानी लोकगीत, मी जे जे संगीत ऐकतो, त्या साऱ्याचा संस्कार संयोजनात झालेला असतो.

२०१५ साली विनीत गोरे आयोजित पंचमदा कार्यक्रमासाठी निवेदन केलं. एका वेगळ्या तरीही पूरक क्षेत्रात पदार्पण का ? असं विचारताच ते म्हणतात, या सृष्टीतील पूर्वसूरी, सारे दिग्गज कलाकार, सुरुवातीच्या कठीण काळापासून, प्रतिकूल परिस्थितीशी झगडत, स्वत:च्या हिमतीवर नावारूपाला आले. आपल्याला उत्तम संगीत, अप्रतिम चित्रपट दिले. पण त्यांच्याबद्दल कोणाला फारशी माहिती नाही. त्यांचा संघर्ष, नवीन शोधलेल्या गोष्टी, वैशिष्ट्यं सांगण्यासारखं कितीतरी आहे. ते आपण सांगितलं पाहिजे असं वाटलं. आनंद स्वत: कविता करतात. त्यांची कविता स्वत:ची चाल घेऊनच येते. खांडव्याला किशोरदांच्या जयंती निमित्त एक समारोह असतो. त्यात स्वत:च्या रचना सादर केल्या आहेत. वादकांना नोटेशन्सची भीती वाटते. त्यांच्यासाठी Notation - No tension नावाचा कोर्स चालू केला आहे. Basics of music arrangement आणि advanced music arrangement असे दोन कोर्स घेतले आहेत.

आपल्या कारकिर्दीविषयी आनंद संपूर्ण समाधानी आहेत. त्यांना अनेक अंध गायक ठाऊक आहेत जे उत्तम गातात. त्यांच्यासाठी काम करून संगीताच्या मुख्य प्रवाहात आणायची इच्छा आहे. आनंद यांच्या या इच्छेला त्रिवार मुजरा आणि लवकरच कारकिर्दीचा

अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२



मनोरंजन विश्व

# चंद्रमुखी

गेले अनेक दिवस आपल्याला उत्सुकता होती आणि ती म्हणजे 'चंद्रमुखी'या बहुचर्चित



आगामी मराठी चित्रपटात 'चंद्रा' च्या मध्यवर्ती भूमिकेत कोण असणार आहे याची,पण आता ती उत्सुकता संपली आहे. काही दिवसांपूर्वी एका भव्य दिव्य सोहळयात दक्षिण मुंबईतील रॉयल ऑपेरा हाऊस थिएटरमध्ये 'चंद्रा' च्या ३५ फुटी छायाचित्राचे अनावरण करण्यात आले आणि त्यावेळी सादर झालेल्या 'चंद्रा' या गीतातून 'चंद्रमुखी' म्हणजे सुप्रसिद्ध अभिनेत्री अमृता खानविलकर आहे, हे सत्य आपल्यासमोर आले. अतिशय कल्पक पद्धतीने या सोहळ्याचे आयोजन केले होते. लाल दिव्याच्या गाडीतून दौलत मानेच्या व्यक्तिरेखेच्याच पोशाखात अभिनेते आदिनाथ कोठारे यांचे आगमन झाले आणि त्यांनी या फोटोचे अनावरण केले.

चित्रपटाचे दिग्दर्शक प्रसाद ओक म्हणतात, ''चंद्रमुखीचा चेहरा प्रेक्षकांसमोर कधी येणार, याची आम्हीसुद्धा आतुरतेने वाट पाहात होतो. मात्र यासाठी आम्ही योग्य वेळेच्या शोधात होतो आणि अखेर ती योग्य वेळ आली आहे. चंद्रा ही अशी लावण्यवती आहे, जिच्या सौंदर्याने कोणीही घायाळ होईल. आपल्या सौंदर्याने, अदांनी समोरच्याला मोहात पाडणारी 'चंद्रा' लढवय्यी आहे. तिच्या या लढ्याला यश मिळते का, हे 'चंद्रमुखी' पाहिल्यावरच कळेल.'' आपल्या भूमिकेबद्दल अमृता खानविलकर म्हणते, ''आजवर साकारलेल्या भूमिकांपेक्षा सर्वात वेगळी आणि ताकदीची भूमिका मी 'चंद्रमुखी'मध्ये साकारत आहे. चंद्रा ही एक लावणी कलावंत असून लावणी कलावंतांचे जीवन ती प्रेक्षकांसमोर आणणार आहे.' 'चंद्रमुखी' या चित्रपटाला अजय-अतुल यांचे संगीत लाभले आहे. विश्वास पाटील यांच्या 'चंद्रमुखी' कादंबरीवर आधारित, अक्षय बर्दापूरकर, प्लॅनेट मराठी आणि गोल्डन रेशो फिल्म्स निर्मित, क्रिएटिव्ह वाईब प्रॉडक्शन प्रस्तुत फ्लाइंग ड्रॅगन एंटरटेनमेंट, लाइटविदिन एंटरटेनमेंट सहप्रस्तुत या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद ओक यांनी केले असून पटकथा, संवाद चिन्मय मांडलेकर यांचे आहेत. या चित्रपटाच्या छायाचित्रणाची धुरा संजय मेमाणे यांनी सांभाळली असून 'चंद्रमुखी' येत्या २९ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# शेर शिवराज

'फर्जंद,फत्तेशिकस्त,पावनखिंड या ऐतिहासिक चित्रपटांच्या अभूतपूर्व यशानंतर आता या महिन्यात २२ एप्रिलला 'शेर शिवराज' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येतोय.




'शिवराज अष्टक' या संकल्पनेतील हे चौथे पुष्प आह.'शेर शिवराज' चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा वध कसा केला? हे पहायला मिळणार आहे. प्रतापगड आणि अफझलखान यांचा खूप जवळचा संबंध आहे. राजांना जेरबंद करण्याच्या उद्देशानं भला मोठा फौजफाटा घेऊन सर्व तयारीनिशी अफझलखान प्रतापगडाच्या पायथ्याशी येऊन पोहोचला खरा, पण पुन्हा माघारी जाऊ शकला नाही. तिथेच त्याची कबर खोदली गेली कारण खानाला शिवरायांच्या युद्धनीतीची, बुद्धीचातुर्याची, गनिमी काव्याची यासोबतच संयम, शिष्टाई आणि चतुराई या गुणांची जराही कल्पना नव्हती. शिवरायांच्या याच अद्भुत गुणांचं आणि अनोख्या युद्ध कौशल्याचं दर्शन 'शेर शिवराज' या चित्रपटात घडणार आहे. यासोबतच त्या काळातील सामाजिक, राजकीय वातावरण, राजांच्या अचूक निर्णयांचा रयतेला होणारा फायदा, शत्रूंची आक्रमणं परतवून लावण्याची शक्ती, अफझलखानाची स्वारी, खानाचा वध करत विजापूरी साम्राज्याला राजांनी लावलेला सुरुंग आणि त्यामुळं हादरलेल्या आदिलशाहीचं यथोचित चित्रण 'शेर शिवराज' मध्ये दिग्पालनं केलं आहे.'शेर शिवराज' चित्रपटाची निर्मिती मुंबई मुवी स्टुडिओजचे नितीन केणी, राजवारसा प्रोडक्शनचे प्रद्योत पेंढरकर व अनिल नारायणराव वरखडे, तसेच मुळाक्षरचे दिग्पाल लांजेकर व चिन्मय मांडलेकर यांनी केली आहे.दिग्पाल लांजेकर लिखित दिग्दर्शित 'शेर शिवराज' या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका चिन्मय मांडलेकर यांनीच साकारली आहे. ऐतिहासिक चित्रपटांच्या निर्मितीच्या निमित्ताने आजची डिजिटल युगातील पिढी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या इतिहासाकडे वळेल आणि त्या निमित्ताने इतिहास वाचनाची,त्याच्या अभ्यासाची देखील आजच्या पिढीला गोडी लागू शकेल, असा विश्वास नक्कीच वाटतो.

गणेश आचवल
९८२१२६८३९१

